महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ५९ वा | दिनांक : २७/११/२०२४ | वार : बुधवार

# सुप्रीम कोर्टाने ईव्हीएम विरोधातील याचिका फेटाळली



**दिल्ली :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीने प्रचंड बहुमत मिळाले आहे. तर महाविकास आघाडीचा सुपडा साफ झाला. ईव्हीएममधील गडबडीमुळे मतमोजणीत घोळ झाल्याचा दावा मविआच्या नेत्यांकडून करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर ईव्हीएम बंद करून पुन्हा बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्यात याव्यात, अशा मागणीची के.ए. पॉल यांनी सुप्रीम कोर्टात दाखल केली होती. मात्र, कोर्टाने ही याचिका फेटाळून लावली. पराभव झाला तर ईव्हीएममध्ये बिघाड आणि निवडणूक जिंकली तर ते यश असे कसे होऊ शकते? असा शब्दांत सुप्रीम कोर्टाने याचिकाकर्त्यांची कानउघडणी केली.

के.ए. पॉल यांनी ईव्हीएम संबंधित एक याचिका सुप्रीम कोर्टात दाखल केली होती. पुन्हा बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्यात याव्यात, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली. या याचिकेवर न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि पी. बी. वराळे यांच्या खंठपीठासमोर सुनावणी पार पडली. ईव्हीएममध्ये छेडछाड केली जात असल्याचा मुद्दा उपस्थित करत एलॉन मस्क यांच्या ईव्हीएम मशीन बाबतच्या विधानाचा संदर्भही कोर्टात देण्यात आला. तसेच चंद्रबाबू नायडू आणि वाय. एस. जगन मोहन रेड्डी यांनी देखील ईव्हीएमबाबत उपस्थित केलेल्या शंकाही कोर्टात सांगितल्या.

मात्र, सुप्रीम कोर्टाने ही याचिका फेटाळून लावली. चंद्राबाबू नायडू किंवा रेड्डी जेव्हा पराभूत होतात, तेव्हा ते म्हणतात ईव्हीएममध्ये छेडछाड केलीये. पण जेव्हा ते जिंकतात, तेव्हा ते काहीच म्हणत नाहीत. याकडे आपण कसे बघायचे? असा सवाल कोर्टाने विचारला. तसेच जेव्हा तुम्ही जिंकता, तेव्हा ईव्हीएममध्ये छेडछाड नसते. पण, जेव्हा तुम्ही पराभूत होता, तेव्हा ईव्हीएमसोबत छेडछाड झालेली असते. जगापेक्षा तुम्हाला वेगळे का नकोय?, असेही न्यायमूर्तींनी याचिकाकर्त्यांना विचारले.

ईव्हीएम मशीनच्या गडबडीच्या माध्यमातूनच महाविकास आघाडीचा पराभव झाला असल्याचा दावा शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. ईव्हीएम मशीन विरोधात आम्ही आजच नाही तर या आधी पासूनच बोलत असल्याचे जितेंद्र आवड यांनी म्हटले आहे. ईव्हीएम मशीन मध्ये काहीतरी गडबड नक्कीच असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे. त्यामुळे आता या विरोधात जन आंदोलन उभे करण्यासाठी सर्व विरोधकांनी एकत्र येण्याची आवश्यकता असल्याचे आव्हाड यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले आहे.

## उद्धव ठाकरेंची स्थिती 'शोले' चित्रपटातील असराणी सारखी : बावनकुळे



**मुंबई :** उद्धव ठाकरे यांची परिस्थितीत शोले चित्रपटातील असराणी यांच्या सारखी झाली असल्याचे भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. या माध्यमातून बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. उद्धव ठाकरे यांच्या निवडून आलेल्या वीस आमदारांपैकी केवळ दोन आमदार त्यांच्यासोबत राहतील, बाकी सगळे निघून जातील, असे देखील बावनकुळे यांनी म्हटले आहे.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. उद्धव ठाकरे यांचे केवळ वीस आमदार निवडून आले आहेत. मात्र आता आगामी काळात ते वीस आमदार देखील त्यांना मानायला तयार नसल्याचे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

यातील केवळ दोन आमदार त्यांच्यासोबत राहतील, बाकी निघून जातील, असे देखील बावनकुळे यांनी म्हटले आहे. शोले चित्रपटात असराणी हे जेलर होते. त्यात ते कायम 'आधे इधर जाओ, आधी उधर जाओ, बाकी मेरे पीछे आओ' असे म्हणत होते. मात्र, मागे येण्यासाठी त्यांच्याकडे कोणीच उरलेले नसायचे. तसेच उद्धव ठाकरे यांचे झाले असल्याचे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनाही बावनकुळे यांनी टोला लगावला. नाना पटोले यांनी त्यांच्या मतदारसंघात बराच वेळ घालवला, जिथे ते मुख्यमंत्री होण्याच्या मार्गावर असल्याचा दावा ते करत होते.

प्रत्येक ठिकाणी प्रचार करताना त्यांनी वारंवार मीच मुख्यमंत्री होणार असल्याचा उल्लेख केला होता. खेडेगावात आणि विधानसभा क्षेत्रावर दावे करूनही आणि मत मिळवण्यासाठी धमक्या देऊनही, ते आता त्यांच्या मतदारसंघात कमी वेळ का घालवत आहेत? असा प्रश्न बावनकुळे यांनी उपस्थित केला. पटोले यांनी आता मूल्यांकन करायला हवे, असेही ते म्हणाले.

मराठी टायपिंगसाठी
डी.टी.पी.ऑपरेटर मुले पाहिजे
------: संपर्क :------
साहिल कॉम्प्युटर्स
विद्यापीठ गेटजवळ, मोनूज हॉटेल,
जयसिंगपूरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद)
मो. 8956362639 /8087880274

# देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व्हावे : भाजप नेत्यांची मागणी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यात मुख्यमंत्री पदाचा तिढा अजूनही सुटलेला नाही. भाजपच्या १३२ जागा आल्यानंतरही देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मुख्यमंत्री मिळवण्याबाबतचा संघर्ष सुरू आहे. त्यामुळे भाजपच्या वतीने देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व्हावे यासाठी संभाजीनगर शहरातील सुपारी हनुमान येथे भाजपकडून महाआरती करण्यात आली. संकट मोचक असणाऱ्या हनुमानाची आरती करून फडणवीस यांच्या समोरील संकट दूर करण्यात यावे, असे साकडे यावेळी घालण्यात आल्याची माहिती भाजपचे शहराध्यक्ष शिरीष बोराळकर यांनी दिली आहे.

भाजपमध्ये फडणवीस यांना मुख्यमंत्री पद मिळावे यासाठी मोठ्या प्रमाणात पदाधिकाऱ्यांकडून मागणी करण्यात येत आहे.त्यासाठी विविध ठिकाणी भाजपकडून महाआरती देखील करण्यात येत आहे. शहरातल्या सुपारी हनुमान मंदिर भाजपच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने महाआरती करण्यात आली.

यावेळी मोठ्या प्रमाणात शहरातील भाजप पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री व्हावे यासाठी यावेळी मारुतीला साकडे घालण्यात आले. यावेळी लाडक्या बहिणींची देखील उपस्थिती होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २७ नोव्हेंबर २०२४


## वित्तीय संस्था चालवितांना संस्थांनी काळजी घेणे गरजेचे- ॲड कृष्णा पाटील जाधव




**कन्नड (अरुण थोरात):** अलीकडच्या काळात कोणती ही वित्तीय संस्था असो, त्यात प्रामुख्याने सहकारी बँक, सहकारी पतसंस्था, पतपेढी व अन्य वित्तीय संस्था चालविणे अत्यंत कठीण होऊन बसले आहे त्यासाठी संस्थानी पुरेपूर काळजी घेणे अवश्यक असल्याचे मत ॲड. कृष्णा पाटील जाधव यांनी व्यक्त केले आहे.

कन्नड येथील आयोजित कार्यक्रमात बोलत होते. वित्तीय संस्था चालवताना अत्यंत काळजी घेणे नितांत गरजेचे आहे. कर्ज देताना ग्राहकाला पूर्णपणे आवश्यक त्या कागदपत्रा सह तसेच शोध अहवाल सह सादर करण्याबाबत सूचना देऊन त्याची पूर्तता करून घेणे गरजेचे आहे.

तसेच कर्जदार नोकरीला असेल तर त्याचे कार्यालयाकडून हमीपत्र व पगार पत्रक घेणे अत्यंत गरजेचे आहे, संरक्षित कर्ज व नियमित वसुली केल्यास वित्तीय संस्था निश्चितपणे भरभराटीला येते असे ही मत त्यांनी व्यक्त केले.

माऊली मल्टीस्टेट को-ऑपरेटिव क्रेडिट सोसायटी ग्रुप ने १०० कोटी ठेवी गोळा करण्याचा उच्चांक व उद्दिष्ट गाठले असून त्यानिमित्ताने कन्नड येथील शाखेत केक कापण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

माऊली मल्टीस्टेट संस्थेचे संचालक सचिव या नात्याने ॲड. कृष्णा पाटील जाधव यांच्या हस्ते केक कापण्यात आला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे चेअरमन जगन्नाथ नाना खैरनार, संचालक - विलास जाईबहार, नितीन ढोले, अतुल खैरनार, संचालिका निर्मला अहिरे, वसंतराव अहिरे इत्यादी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे व्यवस्थापक निलेश तिवारी यांनी केले. तर सूत्रसंचालन संस्थेच्या उपव्यवस्थापक स्वरांजली थेटे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रीती देशमुख यांनी केले, यावेळी संस्थेचे सर्व कर्मचारी ग्राहक खातेदार व राजकीय पदाधिकारी उपस्थित होते.

## डॉ. (सौ) इं.भा.पा.महिला महाविद्यालयात भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला.

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. (सौ) इं.भा.पा.महिला महाविद्यालयात २६ नोव्हेंबर २०२४ रोजी राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना समिती यांच्या संयुक्त विद्यमाने ७५ वा भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई व कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षक प्रा. माधुरी भावसार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली.

त्यानंतर राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. संध्या देशपांडे यांनी भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन केले.

यावेळी राज्यशास्त्र विभाग अंतर्गत गुगल फॉर्मवर प्रश्नावली तयार करून विद्यार्थ्यांकडून सोडवून घेऊन सोडवून त्यांना प्रमाणपत्राचे वाटप ऑनलाईन करण्यात आले.

या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. अन्विता अग्रवाल यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी मिनल श्रीगिरीवार यांनी केले.






## जयभवानीच्या अंसराज जेसवाल यास विद्यापीठस्तरीय जुडो स्पर्धेत सुवर्ण पदक




**पाटोदा (प्रतिनिधी) :** येथिल जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालयाचा विद्यार्थी अंसराज जेसवाल याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ,छत्रपती संभाजी नगर व देवगिरी महाविद्यालय,छ. संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विद्यापीठ स्तरीय पुरुष जुडो स्पर्धेत ७२ किलो वजन गटात विद्यापीठात सर्वप्रथम येवून सुवर्ण पदक मिळविले आहे.

या यशामुळे जयभवानी महाविद्यालयाच्या शिरपेचात आजुन एक मानाचा तुरा रोवला आहे.

अंसराज जेसवाल याला क्रिडा विभाग प्रमुख प्रा.डॉ.प्रविण शिलेदार यांचे मार्गदर्शन मिळाले आहे.महाविद्यालयास सुवर्ण पदक मिळवून दिल्याबद्दल खेळाडू अंसराज जेसवाल व प्रा. डॉ.प्रविण शिलेदार यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री मा.श्री.शिवाजीरावदादा पंडित, अध्यक्ष श्री.अमरसिंह पंडित सचिव श्री.जयसिंह पंडित, आमदार श्री.विजयसिंह पंडित, युवा नेते श्री.रणविर काका पंडित, व श्री.पृथ्वीराजे पंडित, प्राचार्य डॉ.विश्वास कदम,प्रा.सोमनाथ घाडगे, श्री.दिलीपराव जाधव व सर्व प्राध्यापक वृंद यांनी हार्दिक अभिनंदन! करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा! दिल्या.

## तिफण कविता महोत्सव कविसंमेलन अध्यक्षपदी डॉ. संध्या महाजन



**कन्नड (अरुण थोरात):** त्रैमासिक तिफण, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड च्या वतीने कन्नड तालुक्यातील ग्रामीण भागात राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त जानेवारीत श्रीक्षेत्र भगवान गड, मेहगाव येथे राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवाचे हे सातवे वर्ष आहे. महोत्सवात राज्यभरातील कवी, कवितेचे अभ्यासक सहभागी होणार आहेत. या कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. संध्या महाजन यांची निवड करण्यात आली आहे.

डॉ. संध्या महाजन या वरणगाव येथील कामधेनू अध्यापक विद्यालया च्या मा.प्राचार्या आहेत. त्यांना आतापर्यंत खान्देश रणरागिणी पुरस्कार, कवीरत्न पुरस्कार, शब्दमाऊली पुरस्कार, आदी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहेत.

त्यांच्या काव्यसंध्या या कविता संग्रहास तापीपूर्णा फाऊंडेशनच्या वतीने उत्कृष्ट काव्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहेत. मराठी साहित्यातील मानवतावाद या समिक्षाग्रंथातून समिक्षणात्मक लेखन केले आहे. तसेच विविध कविसंमेलनांचे अध्यक्ष पद ही त्यांनी भुषविले आहे.

त्रै.मा. मैफल च्या संपादक म्हणून ही त्यांनी काम केले आहे. त्यांचा सुलभी, गावकुसा च्या गोष्टी, तिच्या कथा तिच्या व्यथा हे कथासंग्रह, बाईचा जलम, गावाकडची माटी आदी काव्यसंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. विविध मासिके, आकाशवाणी साठी ही त्यांनी लेखन करित आहेत.

त्यांच्या या निवडी बद्दल तिफण कविता महोत्सव संयोजन समिती चे मार्गदर्शक प्राचार्य विजय भोसले, ॲड कृष्णा जाधव, रंगनाथ लहाने, संयोजक डॉ. शिवाजी हूसे, डॉ. रामचंद्र झाडे, स्वागताध्यक्ष गणेश घुगे, संदीप ढाकणे, प्रविण दाभाडे, अरुण थोरात, ज्ञानेश्वर गायके, अनिता राठोड, शुभदा देवरे, भिमराव सोनवणे, का. का. थोरात, अर्चना धाटबळे, गीतांजली गजबे, संदीप वाकडे, लक्ष्मण वाल्डे, श्रीराम दापके, प्रकाश शहरवाले, दत्ता मोरस्कर, केशरचंद राठोड, प्रकाश शहरवाले, शिवनाथ गायकवाड, ब्रम्हगिरी गोस्वामी, भरत सोनवणे, अजय दवंडे, आदिंनी अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २७ नोव्हेंबर २०२४

# राष्ट्राच्या अखंडत्वासाठी संवैधानिक मूल्ये रुजविण्याची आवश्यकता - प्राचार्य डॉ. संजय अस्वले



**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात दिनांक २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. दोन वर्ष अकरा महीने अठरा दिवस अथक परिश्रम घेऊन घटना समितीने स्वतंत्र भारतासाठी तयार केलेले संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीने स्वीकृत केले.

याच संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता या संवैधानिक मूल्यामुळेच भारताचे अखंडत्व टिकून आहे, त्यामुळे प्रत्येकाने संवैधानिक मूल्यांचे संवर्धन करावे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी केले. महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, एनसीसी आणि करियर कट्टा विभागाच्या वतीने आयोजित संविधान दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते उपस्थित होते.

यावेळी संविधान दिनानिमित्त भारत मातेला वंदन आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ अस्वले, स्टेट बँक ऑफ इंडिया नांदेड ऍडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसचे चीफ मॅनेजर शशिकांत फडताळे आणि उमरगा शाखेचे शैलेश बिराजदार यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर उपप्राचार्य विलास इंगळे, डॉ. पद्माकर पिटले, प्रा. जी. एस. मोरे, प्रा. शैलेश महामुनी राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. सुनील बिराजदार आदी उपस्थित होते. यावेळी संविधानाच्या उद्देशपत्रिकेच्या एक हजार प्रतीचे वाटप सर्व मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांमध्ये करण्यात आले.

पुढे बोलताना प्राचार्य संजय अस्वले म्हणाले की भारतासारख्या विशाल भूप्रदेशांमध्ये विविधता असणाऱ्या समाजाला एकत्र टिकून ठेवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या तरतुदी भारतीय संविधानामध्ये केल्या आहेत. त्यामुळेच देशातील विविध प्रांतात भाषा, संस्कृती, धर्म हे वेगवेगळे असले तरी या सर्व समूहांना आम्ही भारताचे नागरिक या नात्याने एकत्र ठेवण्यासाठी आम्हाला यश आले आहे.

तेव्हा प्रत्येक भारतीय नागरिकाची ही जबाबदारी आहे की आपण संवैधानिक मूल्यांची जपणूक केली पाहिजे, असे प्रतिपादन त्यांनी याप्रसंगी केले. याप्रसंगी राज्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. अनिल देशमुख यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन केले.

यावेळी कार्यक्रम अधिकारी डॉ. गिरिधर सोमवंशी यांनी भारत हा जगातील सगळ्यात मोठी लोकशाही असणारा देश असून या देशातील लोकशाहीच्या यशस्वीतेचे सर्व श्रेय हे भारतीय संविधानालाच द्यावे लागेल असे प्रतिपादन केले.

हा देश कुठल्याही धर्मग्रंथाच्या आधारावर चालत नसून तो संविधानानुसार चालतो त्यामुळे प्रत्येक भारतीय नागरिकांनी संविधानातील तरतुदींची माहिती करून घेतली पाहिजे तसेच गावागावात संविधानाचे पारायण झाले पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी याप्रसंगी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. डी . बी. ढोबळे यांनी केले तर प्रा. समाधान पसरकल्ले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या कार्यक्रमाला प्रा. डॉ. डी .एस. चिट्टमपल्ले, डॉ . भारत शेळके, प्रा. मुरली जाधव, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालयाची शैक्षणिक व औद्योगिक सहल संपन्न



**शिरसाळा (प्रतिनिधी):** श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय शिरसाळा ता. परळी वै. जिल्हा बीड अर्थशास्त्र विभाग व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने उदगीर येथे शैक्षणिक व औद्योगिक सहल काढण्यात आली होती.

उदगीर येथील ऐतिहासिक किल्ला हा भुईकोट किल्ला म्हणून ओळखला जातो, या किल्ल्याच्या माध्यमातून जागतिक वारसा जोपासण्याचे काम या ठिकाणी केले जाते या किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व, वैशिष्ट्ये, किल्ल्याचा इतिहास याबाबतीमध्ये विद्यार्थ्यांना माहिती व्हावी म्हणून डॉ.अनंत शिंदे यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

तसेच बौद्ध धम्मा मध्ये विहार किंवा स्तूप याला खुप मोठे महत्त्व आहे. उदगीर येथील बौद्ध स्तूप हे सुद्धा विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. त्यानंतर उदगीर मध्ये नामांकित दाळमिल व लाकडी घाणा हे सुद्धा व्यवसायाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठिकाण दाखविण्यात आले.

आधुनिक काळामध्ये आरोग्याच्या दृष्टीने ऑरगॅनिक शेती व ऑर्गानिक उत्पादने याकडे मोठ्या प्रमाणात कल वाढलेला आहे त्यामुळे खाद्यतेल हे लाकडी घाण्याच्या माध्यमातून काढण्याची पद्धती त्याची विक्री त्यापासून तयार केली जाणारी दुय्यम उत्पादने तसेच विविध दाळी तयार करण्याचा कारखाना त्यामध्ये उडीद तूर मूग चना मटकी यासारख्या अनेक डाळी करण्याची प्रक्रिया व त्यापासून तयार होणारे दुय्यम उत्पादने याबाबतीमध्ये विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन मिल चे मालक श्री धीरज संजय तांदळे यांनी केले.

डाळ मिल व लाकडी तेल घाना या व्यवसाया च्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन नवनवीन व्यवसायामध्ये कार्यरत व्हावी असे धीरज तांदळे यांनी आपले मत व्यक्त केले.

इतिहास विभागप्रमुख डॉ. जी. वी. गट्टी, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. ए. साबळे, प्रा. रेखा लोणीकर प्रा. संगीता माने, इतिहास विभागप्रमुख डॉ. आनंत शिंदे या सर्वांनी शिस्तबद्ध नियोजन करून ही सहल यशस्वीरित्या संपन्न केली. या सहलीमध्ये अर्थशास्त्र विभाग इतिहास विभागाचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

# मालेगावला माजी नगरसेवकावर गोळीबार



**मालेगाव :** विधानसभेची मतदान व मतमोजणीप्रक्रिया शांततेत पूर्ण झाली आहे. निकालानंतर काहीउपद्रवी हेतुपुरस्सर शहराचे वातावरण खराबकरण्याचा प्रयत्न करत आहे. पोलिसांकडे यासंदर्भाततक्रारी प्राप्त झाल्या आहेत. प्रशासनाने याची गंभीरदखल घेतली असून कायदा हातात घ्याल तर यादराखा अशी तंबी अपर पोलिस अधीक्षक अनिकेत भारती यांनी राजकीय पक्ष कार्यकर्ते व समर्थकांनादिली आहे. निवडणूक निकाल घेषित झाल्यानंतर काही ठिकाणी राजकीय पक्षांच्या समर्थकांमध्येवादावादीचे प्रकार घडत आहे.

घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. पोलिसांनी हे फुटेजताब्यात घेतले असून परिसरातीलइतर भागातील सीसीटिव्ही कॅमेऱ्यांचेफुटेज तपासले जात आहे.हल्लेखाेरांची ओळख पटविण्याचेकाम सुरु आहे. घटनेचा लवकरचउलगडा होईल असे सहायकअधीक्षक संधू यांनी सांगितले.

मध्य मतदारसंघात चुरशीच्या लढतीत अवघ्या १६२ मतांनी विजयावर शिक्कामोर्तब झाला आहे. निसटतापराभव जिव्हारी लागल्याने पराभूतउमेदवारांच्या समर्थकांमध्ये नाराजीआहे. तर दुसरीकडे अल्प मतांच्या विजयामुळे विजयी उमेदवारांचे समर्थक जोमात आहेत. कायदा वसुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवणार नाहीयाची काळजी घेऊन समर्थकांना आवर घाला, अशाशब्दात भारती यांनी नेत्यांची कानउघाडणी केली.

विधानसभा निवडणूक निकालघोषित झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी मालेगावात गोळीबाराची घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. आमदार मुफ्ती इस्माईल यांचेसमर्थक माजी नगरसेवक नदीमुद्दीन अलीमुद्दीन ऊर्फ नदीम फीटरयांच्यावर दुचाकीवरुन आलेल्या दोघा अज्ञातांनी गोळीबार केला.

नदीम हे घरात पळाल्याने थोडक्यात बचावले. हा प्रकार आझादनगर भागातील बागे महेमूद परिसरातरविवारी रात्री पावणेबारा वाजताघडला. दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळाहून एक जिवंत काडतूसव रिकामी पुंगळी जप्त केली आहे.

नदीम फीटर हे रात्री घराबाहेर शेजारच्याशी गप्पा मारत उभे होते. थोड्या वेळानंतर गेटचा दरवाजाउघडून ते दुचाकीजवळ येऊनथांबले. यावेळी दुचाकीवरूनआलेल्या दाेघांपैकी पाठीमागेबसलेल्या व्यक्तीने अचानकत्यांच्यावर गोळीबार केला. नदीम हेतत्काळ घरात पळाल्याने त्यांना गोळी लागली नाही. गोळीबार करून दोघेही संशयित फरार झाले.

घटनेचीमाहिती मिळताच अपर पोलिस अधीक्षक अनिकेत भारती, सहायक पोलिस अधीक्षक तेगबीरसिंह संधू हे घटनास्थळी दाखल झाले.

घटनेमुळे परिसरात तणाव निर्माण झाल्याने पोलिसांनी बंदोबस्तात वाढ केली. पोलिसांनी घटनास्थळाची पहाणीकरत एक रिकामी पुंगळी व एकजिवंत काडतूस हस्तगत केले.

गोळीबार का व कुणी केला याचा पोलिस तपास करत आहे. यामागे राजकीय तसेच आर्थिकदेवाण-घेवाण, बनाव यासह इतर शक्यतांची पोलिसांकडून पडताळणी केली जात आहे. याप्रकरणीआझादनगर पोलिस ठाण्यात गुन्हादाखल झाला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २७ नोव्हेंबर २०२४


## नरसय्या आडम मास्तरांची संसदीय राजकारणातून निवृत्ती



**सोलापूर** : जिल्ह्यातील माजी आमदार आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे (माकप) नेते नरसय्या आडम (मास्तर) यांनी संसदीय राजकारणातून निवृत्ती घेणार असल्याची घोषणा केली आहे. सोलापूरमध्ये विधानसभा निवडणुकीत त्यांचा सलग चौथ्यांदा पराभव झाला आहे. त्यानंतर आडम मास्तरांनी हा निर्णय घेतला आहे. आयुष्यभर सामाजिक चळवळीत काम करणारे नेते म्हणून त्यांना ओळखले जाते. यापुढे केवळ पक्षाचा कार्यकर्ता म्हणून निवडणुकीमध्ये सहभागी होणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघात आडम मास्तर यांनी विधानसभा निवडणूक लढवली होती. मात्र त्यांचा पराभव स्वीकारावा लागला. हा त्यांचा सलग चौथा पराभव आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी काँग्रेसचे उमेदवार प्रणिती शिंदे यांना पाठिंबा दिला होता. त्यामुळे या मतदारसंघातून यावेळी महाविकास आघाडी आडम मास्तरांना संधी देईल, अशी त्यांना अपेक्षा होती. मात्र काँग्रेसने येथून चेतन नरोटे यांना उमेदवारी दिली. त्यामुळे आडम यांनी काँग्रेस उमेदवाराच्या विरोधात निवडणूक लढवली. या मतदारसंघात भारतीय जनता पक्षाचे देवेंद्र कोठे हे विजयी झाले आहेत. त्यामुळे आता आडम मास्तरांनी संसदीय राजकारणातून निवृत्त होण्याची घोषणा केली आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे आणि खासदार प्रणिती शिंदे आणि माकपचे नेते नरसय्या आडम हे एकमेकांचे कट्टर विरोधक मानले जात होते. मात्र, नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत आडम मास्तरांनी प्रणिती शिंदे यांचा प्रचार केला होता. त्याचा फायदा देखील शिंदे यांना झाला. प्रणिती शिंदे लोकसभेवर निवडून गेल्यामुळे त्यांच्या रिक्त असलेल्या विधानसभेच्या जागेवर आडम मास्तरांनी पुन्हा एका तयारी सुरू केली होती.

तसेच त्यासाठी माकपकडून 'नोट भी दो, वोट भी दो' अभियान राबवण्यात आले. मात्र, महाविकास आघाडीने नरसय्या आडम यांच्यासाठी ही जागा सोडली नाही. त्यामुळे त्यांनी पुन्हा या मतमदारसंघातून निवडणूक लढवली. यात त्यांचा पराभव झाला.

## बाल साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी बाल साहित्यिक डॉक्टर श्रीकांत पाटील



**अमरावती** : मराठा सेवा संघ प्रणित जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेच्या स्थानिक शाखेतर्फे आगामी गुरुवार, २८ नोव्हेंबरला महात्मा फुले पुण्यतिथीच्या पर्वावर श्री क्षेत्र गुरुकुंज आश्रम मोझरीच्या स्मृती मंदिरात बाल साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या सम्मेलनाच्या अध्यक्षस्थानी कोल्हापूरचे ज्येष्ठ कादंबरीकार व बाल साहित्यिक डॉ. श्रीकांत पाटील यांची निवड करण्यात आली आहे.

या संमेलनाचे उद्घाटन अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्दनपंत बोथे करणार आहेत. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध इतिहास संशोधक, ख्यातनाम वक्ते, लेखक व मराठा सेवा संघाचे राज्य महासचिव चंद्रशेखर शिखरे, पुण्याचे ज्येष्ठ साहित्यिक शिवाजी चाळक, प्रसिद्ध साहित्यिक तथा साहित्य संस्कृती मंडळ मुंबईचे सदस्य विलास सिंदगीकर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रियाताई देशमुख व विद्यापीठाच्या संत गाडगेबाबा अध्यासनाचे प्रमुख प्राचार्य दिलीप काळे उपस्थित राहणार आहेत. उद्घाटन प्रसंगी साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त बाल साहित्यिक एकनाथ आव्हाड (मुंबई) यांचा सत्कार आयोजित करण्यात आला आहे.

या संमेलनाचे उद्घाटन सकाळी नऊ वाजता होणार असून त्यापूर्वी सकाळी आठ वाजता ग्रंथ दिंडी काढली जाणार आहे. सकाळी ११ वाजता 'बालसाहित्य वास्तव आणि अपेक्षा' या विषयावर परिसंवाद होईल.

परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेचे राज्याध्यक्ष डॉ. सतीश तराळ राहणार असून या परिसंवादात प्राचार्य एकनाथ तट्टे परतवाडा, प्राचार्य राजावलीकर अमरावती, प्रा. डॉ. प्रशांत राऊत नागपूर, प्रा. प्रणाली तेली कोल्हापूर, प्रा. अलका गायकवाड अमरावती व अ‍ॅड. नीता कचवे दर्यापूर हे सहभागी होणार आहेत. दुपारी दीड वाजता सुप्रसिद्ध बाल साहित्यिक बबन शिंदे नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली कथाकथन आयोजित करण्यात आले असून यात विलास सिंदगीकर, प्रा. विजया मारोतकर, डॉ. शोभा गायकवाड, प्राचार्य अनिल प्रांजळे, डॉ मंदा नांदुरकर, चंद्रकांत निकाळे, विनोद तिरमारे, बबलू कराळे आपल्या कथा सांगणार आहेत






## शिवेंद्रराजेंच्या मंत्रिपदासाठी उदयनराजेंची लॉबिंग



**मुंबई** : खासदार छत्रपती उदयनराजे भोसले यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची देवगिरी बंगल्यावर तर सागर बंगल्यावर जाऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील भेट घेतली आहे. यावेळी उदयनराजे भोसले यांनी सत्कार देखील केला आहे. विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशाबद्दल उदयनराजे भोसले यांनी अजित पवार यांचा छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती भेट देऊन सत्कार केला. यावेळी आमदार अतुल भोसले हे देखील उपस्थित होते. यानंतर देवेंद्र फडणवीस यांची सागर बंगल्यावर जाऊन भेट घेत त्यांचा देखील सत्कार केला आहे.

उदयनराजे भोसले यांनी घेतलेल्या या भेटीनंतर शिवेंद्रराजेंच्या मंत्री पदासाठी लॉबींग केली जात असल्याचे बोलले जात आहे.

उदयनराजेंनी ५ आमदारांसह खा. उदयनराजे भोसले यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगण्यास सुरुवात झाली आहे. कोरेगावचे आमदार महेश शिंदे, कराड उत्तरचे आमदार मनोज घोरपडे, कराड दक्षिणचे आमदार अतुल भोसले आणि शिवेंद्रराजे भोसले यांच्यासह खासदार उदयनराजे भोसले यांनी भेट घेतली आहे.

दरम्यान, महाराष्ट्रात महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले असून सत्ता स्थापन केली आहे. मात्र अजूनही मुख्यमंत्री पदासाठी महायुतीमध्ये चर्चा सुरू असल्याचे दिसत आहे. देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री करण्यासाठी भाजपच्या नेत्यांकडून आग्रह धरला जात आहे.

तसेच एकनाथ शिंदे यांनाच पुन्हा एकदा मुख्यमंत्री करण्याची मागणी शिवसेनेकडून केली जात आहे. अशात अजित पवारांनी देखील मागे मुख्यमंत्री होण्यास इच्छुक असल्याचे बोलून दाखवले होते. त्यामुळे आता मुख्यमंत्री कोण होणार याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.